नि.दि.दावा क्रं. १२/२०२२

१ श्रीराम .वि. हरिदास

नि.क्रं. १२ च्या पुढे

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचा सरतपास वादीतर्फे वकिल श्री. पी.के. मिश्रा यांच्याद्वारे –**

१. मी माझ्या पुराव्याचे शपथपत्र दिनांक १५.०१.२०२४ रोजी न्यायालयात दाखल केले आहे. आता मला सदरचे शपथपत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक १२** देण्यात येत आहे.

२. मी यादी निशानी क्रमांक १४ सोबत अनुक्रमांक १ वर नियमित दिवाणी अपील क्रमांक ४८२/२०१७ मध्ये दिनांक ०७.१०.२०२१ रोजी झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक १५** देण्यात येत आहे.

३. मी यादी निशानी क्रमांक १४ सोबत अनुक्रमांक २ वर भुमापन क्रमांक ४७ च्या ७/१२ उता–याची सत्यप्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ग्रामअधिकारी रेवराल यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशानी क्रमांक १६** देण्यात येत आहे.

४. मी यादी निशानी क्रमांक १४ सोबत अनुक्रमांक ३ वर भुमापन क्रमांक ४७ च्या गाव नमुना ८–अ च्या उता–याची सत्यप्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ग्रामअधिकारी रेवराल यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशानी क्रमांक १७** देण्यात येत आहे.

५. मी यादी निशानी क्रमांक ३ सोबत अनुक्रमांक ४ वर सामनेवाने तहसिलदार आणि तलाठी, मौदा यांना माझ्या वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यास **निशानी क्रमांक १८** देण्यात येत आहे.

६. मी यादी निशानी क्रमांक ३ सोबत अनुक्रमांक ५ वर सदर नोटीस

तहसिलदारांना पाठविल्याबद्दलची मुळ पावती आणि त्यांना मिळाल्याबद्दलची स्विकृतीपावती दाखल केली आहे. आता मला सदरच्या प्रती दाखविण्यात आल्या. त्या त्याच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना एकत्रीतरित्या **निशानी क्रमांक १९** देण्यात येत आहे.

७. मी यादी निशानी क्रमांक ३ सोबत अनुक्रमांक ६ वर सदर नोटीस तलाठी, मौदा यांना पाठविल्याबद्दलची मुळ पावती आणि त्यांना मिळाल्याबद्दलची स्विकृतीपावती दाखल केली आहे. आता मला सदरच्या प्रती दाखविण्यात आल्या. त्या त्याच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना एकत्रीतरित्या **निशानी क्रमांक २०** देण्यात येत आहे.

८. मी यादी निशानी क्रमांक ३ सोबत अनुक्रमांक २ वर नियमित दिवाणी दावा ९१/२०१२ जुना नि.दि.दाव क्रमांक ४१२/२००८ मध्ये दिनांक १७.०७.२०१७ रोजी झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रतीची छायांकित प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास आर्टिकल 'अ' देण्यात येत आहे.

**प्रतिवादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत
मौदा.
दिनांक ०३.०८.२०२४

समक्ष

(ए.बी. कादियन )
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मौदा